नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १०७ Issue - 107 | वार बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ Blow- Wednesday Date 3 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संघर्षयोद्ध्याचा विजय




## हैद्राबाद गॅजेट लागू करण्याच्या मागणीस उपसमितीने दिली मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जिंकलो हो...राजे-हो तुमच्या ताकदीवर आपण जिंकलो, सरकारने आपल्या मान्य केल्याचं सांगत आझाद मैदाना-वर एक मराठा, लाख मराठा, छत्रपती शिवाजी महाराज की जय... गणपती बाप्पा मोरया.. अशी घोषणाबाजी करण्यात आली. मुंबईतील आझाद मैदान परिसरात पाटील पाटील.. घोषणांनी दुमदुमला होता. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील मागण्या राज्य सरकारच्यावतीने मान्य करण्यात आल्या असून मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर होते. यावेळी, कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या याची माहितीही जरांगे पाटील यांनी दिली. तसेच, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी २ महिन्यांचा अवधीही राज्य सरकारला देण्यात आला आहे.

मी मराठा आरक्षण समितीचा स्वागत करतो, सचिव सुद्धा आज हजर आ-हेत, त्यांचे आभार. विषय शांततेत समजून घेण्याची गरज आहे. आपलं म्हणणं होत ते निवेदन आपण सादर केलं होत. त्यानुसार, सरकारने आपल्या मागण्या मान्य केल्या आहेत. आपली पहिली मागणी होती, हैद्राबाद गॅजेटची तात्काळ अंमलबजावणी करावी. आता ते म्हणाले आपल्याला मान्य झालं की जीआर काढणार, यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपण अभ्यासकांसोबत सुद्धा चर्चा करणार आहोत नाहीतर वाशी सारखा व्हायचं, असे म्हणत वाशीमध्ये आपली फसवणूक झाल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

> ■ हैदराबादच्या गॅजेटला अंमलबाजावणीला दिली आहे, पुढील काही तासांत याचा शासन आदेश निघेल.
>
> ■ सातारा संस्थानच्या गॅजेटेयर तपासून कायदेशीर पद्धत्तीने जलदगतीने म्हणजेच १५ दिवसांत अमंलबजावणी करु
>
> ■ सातारा गॅजेटअर लागू करण्यासाठी मी एक महिना दिला आहे, त्याचाही शासन आदेश निघणार आहे.
>
> ■ सप्टेंबरअखेरपर्यंत सर्व मराठा आंदोलकांविरोधातले गुन्हे मागे घेणार, त्याचाही शासन आदेश लवकरच निघणार आहे.
>
> ■ आर्थिक मदत आणि शैक्षणिक पात्रतेनूसार शासकिय नोकरी देणार

हैद्राबाद गॅजेट लागू करण्याच्या मागणीस उपसमितीने मान्यता दिली आहे, याचा अर्थ हैद्राबाद गॅजेटची अंमलबजावणी करण्याची सूचना उपसमितीकडून देण्यात येईल. सा-तारा गॅजेटबद्दल आपण मागणी केली होती, म्हणजे पश्चिम महाराष्ट्र मराठा यामध्ये येतो. औंध आणि सातारा मध्ये काही त्रुटी आहेत. पुढील १५ दिवसात कायदेशीर त्रुटीचा अभ्यास करून अंमलबजावणी केली जाईल, असे शास-नाने म्हटले आहे. मी एक महिना देतो, राजे सांगा अंमलबाजवणी करणार का?

हो म्हणा, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शिवेंद्रराजे यांच्याकडूनच याची हमी घेतली आहे. त्यामुळे, आता दोन मागण्यांची अंमलबाजवणी झाल्याचं म्हटलं.

५८ लाख कुणबीच्या नोंदी ग्रामपंचायतीला लावा

आता मराठा आंदोलकांचे गुन्हे मागे घेण्याचा आपली मागणी होती. आता सप्टेंबर अखेरीस सगळे गुन्हे मागे घेण्याचा शासन निर्णय जारी केला जाईल, त्याला मोठी प्रक्रिया आहे. ५८ लाख नोंदीचा विषय आपण काढलाय. मराठा आरक्षण आंदोलनामध्ये बळी गेलेल्या कुटूंबीयांना शासना-ने आत्तापर्यंत १५ कोटी रुपये दिले आहेत. तर, राज्य परिवहन मंडळात नोकरी मिळेल असं यात म्हटलंय. आता त्यात बदल करावा, जर मुलाचे शिक्षण जास्त आले तर सरकारी नोकरी द्यावी, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. ५ वी मागणी ५८ लाख कुणबीच्या नोंदी ग्रामपंचायतीला लावा, म्हणजे लोकांना कळेल नोंदी मिळाल्या. आज २ तारीख आहे, आता आता गेल्या गेल्या एक आदेश काढा प्रमाणपत्र अनेकांचे अडकले आहेत व्हॅलिडिटीमध्ये, त्यावर निर्णय घ्या असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

वंशावळ समिती तालुका स्तरावर निर्माण करा

वंशावळ समिती तालुका स्तरावर निर्माण करा, आणि शिंदे समितीला कार्यालय द्या. शिंदे समितीला नोंदी सुरू ठेवण्याचं काम सुरू ठेवा, ते बंद करू नका

मोडी लिपी समजणारे लोक द्या, नाहीतर आम्ही देतो. आम्ही फुकट काम करू, पैसे नको आम्हाला, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

मराठा-कुणबी एकच, जीआरसाठी २ महिने मुदत

मराठा आणि कुणबी आहे असा जीआर काढा, मराठा कुणबी एकच हा जीआर जारी करा. त्यावर, ते म्हणाले किचकट आहे त्याला वेळ ला-गेल म्हणे, १ महिना लागेल. पण, मी म्हणतो त्याला २ म हिने घ्या पण जी आर काढा. आता सगेसोयरेचा निर्णय घ्या म्हणालो. ते म्हणताय याला वेळ लागेल, ८ लाख चुकीच्या नोंदी आहेत, त्याबद्दल वेळ लागणार आहे. आता, हैदराबाद आणि सातारा या २ गॅजेटच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. बाकी ५ मागण्यांचा शासन निर्णय काढू म्हणत आहेत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शासनाने आपल्या मागण्या मान्य केल्याची घोषणा केली.

---

# ज्यांच्या नोंदी असतील त्यांना कुणबी सर्टिफिकेट मिळणार

## ओबीसी आरक्षणाला धक्का नाही : देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मला कितीही शिव्या दिल्या, दोष दिले तरी मी सगळ्या समाजासाठी काम करणार. मराठा उपसमितीने एक चांगला तोडगा काढला आणि कायद्याच्या चौकटीत बसेल असा निर्णय घेतला अशी पहिली प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी झाल्यामुळे ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांना, त्यांच्या रक्तातील सर्वांनाच कुणबी सर्टिफिकेट मिळणार असल्याचं फडणवीसांनी जाहीर केलं. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलत होते.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आलं. मनोज जरांगे यांनी केलेल्या आठपैकी सहा मागण्या मान्य झाल्या. त्यामधील हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्याची प्रमुख मागणी मान्य झाली. त्याचा फायदा मराठवाड्यातील बहुतांश मराठ्यांना होणार आहे.

हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्यासाठी आमची सुरुवातीपासून तयारी होती. पण त्यामध्ये मनोज जरांगेंची मागणी ही सरसकटची होती. त्यामध्ये कायदेशीर अडचणी होत्या. न्यायालयाचे निर्णय पाहता ते शक्य नव्हतं. ही गोष्ट आम्ही जरांगेंच्या लक्षात आणून दिली. आपल्या कायद्याप्रमाणे, संविधानाप्रमाणे आरक्षण हे समूहाला नसतं तर ते व्यक्तीला दिलं जातं. त्यामुळे सरसकट आरक्षण देता येणार नाही, ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही हे सांगितलं. त्याला जरांगे यांनी मान्यता दिली. त्यानंतर उपसमितीने चर्चा केली आणि जीआर तयार केला.

राधाकृष्ण विखे पाटील आणि उपसमितीतील सर्व प्रमुख नेत्यांचं मी आभार मान-तो. त्यांनी सातत्याने बसून, अभ्यास करून हा मार्ग काढला आहे. जे मराठवाड्यात राहणारे, ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, रक्त-नात्यातील कुणाचाही कुणबी उल्लेख असेल तर त्याला कुणबी सर्टिफिकेट मिळणार. हैदरबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून, ज्यांना पुरावा मिळेल त्यांना आरक्षण मिळणार.






ज्याच्याकडे पुरावा नाही त्याला याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मराठवाड्यात रेकॉर्ड्स नाहीत. त्या ठिकाणी नोंदीचा हा प्रश्न गंभीर होता. त्यावर आम्ही संविधानिक तोडगा काढला. तो कोर्टातही टिकणार आहे असंही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझ्यावर टीका झाली तरी मी जराही विचलित झालो नाही, कारण समजाला न्याय द्यायचा हेच ध्येय होतं. तो न्याय देताना दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही, अन्यायाची भावना निर्माण होणार नाही असा कायदेशीर निर्णय करावा लागेल. मराठा असो, ओबीसी असो वा महाराष्ट्रातील कोणताही समाज असो, प्रत्येक समाजासाठी काम करणं हे माझं कर्तव्य समजतो. त्या कर्तव्यावेळी कधी शिव्या मिळतात तर कधी फुलांचे हार देखील मिळतात.

हैद्राबाद गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्याला शासनाने मान्यता दिली आहे. गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. सातारा गॅझेटिअरवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्या दूर करुन त्याला मान्यता देण्यात येणार आहे. मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार. शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देणार. मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी १५ कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.

# उपोषण सोडताच जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं अशी मागणी करत मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या ५ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केलं होतं.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणासह विविध मागण्यासाठी हे उपोषण सुरू होते, गेल्या २ दिवसांपासून या आंदोलनाची आक्रमकता वाढली होती, उच्च न्यायालयानेही राज्य सरकारवर ताशेरे ओढले होते.

गेल्या ५ दिवसांपासून राज्याचं लक्ष लागलेल्या या आंदोलनाची अखेर आज सांगता झाली. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्याहस्ते ज्यूस पिऊन जरांगे पाटलांनी उपोषण सोडले, तत्पूर्वी सर्व मागण्याचे शासन निर्णय जरांगे पाटील यांना देण्यात आले होते.

जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करत राज्य सरकारने शासन निर्णय जारी केले, त्यानंतर आझाद मैदानात एकच जल्लोष झाला, मनोज जरांगे पाटील यांनीही शासनाचे आभार मानले. मात्र, आनंदोत्सव साजरा करताना पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले आझाद मैदानात सगळीकडे विजयाचा, आर-क्षणाचा लाभ मिळाल्याचा आणि शासन निर्मण हाती पडल्याचा आनंदोत्सव सुरू होता. मात्र, त्याचवेळी जरांगे पाटलांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले, ते पाहून आझाद मैदानही गहिरवल्याचं दिसून आलं.

जरांगे पाटलांच्या खांद्यावर हात ठेऊन राधाकृष्ण विखे पाटील यांना त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, मैदानावरील स्टेजवर गणपतीची आरती करुन गणपती बाप्पा मोरयाचा जयघोषही झाला. राजेहो तुमच्यामुळे जिंकलो, आपल्या मागण्या मान्य झाला असे म्हणताच आझाद मैदानासह राज्यातील अनेक जिल्ह्यात मराठा बांधवांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. गुलालाची उधळण करत आरक्षण आंदोलनाचा विजयोत्सव झाला

दरम्यान, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी सरकारला २ महिन्यांची मुदत देण्यात आली असून उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटील यांनी मुंबईत आलेल्या सर्व आंदोलकांना गावाकडे जाण्याचे, शांततेत राहण्याचे आवाहन केलं आहे.

---

**त्रिसदस्यीय समितीकडून प्रमाणपत्र मिळाल्यास मराठा हे ओबीसीमध्येच येतील : ज्येष्ठ विधीज्ञ सिद्धार्थ शिंदे**

**उच्च न्यायालयात चॅलेंज होऊ शकतं**

# मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यातील मराठा बांधवांना आता कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष क्षरीरपसश) यांच्या नेतृत्वात आझाद मैदानात सुरू असलेल्या उपोषणाची आज सांगता झाली. राज्य शासनाने हैदराबाद गॅझेटियर आणि ५८ लाख नोंदीसंदर्भात शासन निर्णय जारी केल्यानंतर जरांगे पाटलांनी आपले उपोषण मागे घेतले. त्यामुळे, मराठवाड्याच्या ५ जिल्ह्या-तील मराठा बांधवांना आता कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, मराठा समाजाला आता ओबीसीतून आरक्षण मिळणार का, जरांगे पाटलांची जी मुख्य मागणी होती ती पूर्ण झाली का? असे अनेक प्रश्न उपोषणकर्त्यांपुढे, मराठा आणि इतर समाजापुढे आ-हेत. त्यावर, आता सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ सिद्धार्थ शिंदे यांनी यावर कायदेशीर भूमिका मांडली आहे. तसेच, त्रिसदस्यीय समितीकडून प्रमाणपत्र मिळाल्यास मराठा हे ओबीसीमध्येच (जइउ) येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.





राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू केल्यानंतर, मराठ्यांना जातप्रमाणपत्र मिळायला लागलं, जातपडताळणी झाली तर मग मराठ्यांना ज्या तीन कॅटेगरी आ-हेत कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा याचे प्रमाणपत्र मिळाले आणि या प्रमाणपत्रांती पडताळणी झाली तर ते ओबीसीमध्येच येणार. ओबीसीचे सर्व फायदे मिळणार आ-हेत. हैदराबाद गॅझेटियर जीआरप्रमाणे जी प्रमाणपत्र दिली जातील, ज्याची व्हॅलिडिटी होईल, त्यांना जइउ च्या सुविधा मिळणारच आहेत. सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी हैदराबाद गॅझेटियर, सा-तारा गॅझेटियर संदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आल्यानंतर कायदेशीर स्तरावर याचं नेमकं विश्लेषण केलं आहे. हैदराबाद गॅझेटियरसंदर्भातील शासन आदेशात कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत काही गोष्टी दिल्या आहेत. मराठा बांधवांना मराठा कुणबी, कुणबी आणि कुणबी मराठा हे प्रमाणपत्र कसे दिले जा-तील. हैदराबाद गॅझेटियरमध्ये मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यातील गरिब मराठे आहेत, जे अल्पभूधारक आहेत, त्यांच्यासाठी कार्यपद्धती ठरविण्यात आली आहेत. त्रिसदस्यीय समिती ही गावपातळीवर असेल, तुमच्याकडे १९६७ च्या पूर्वीचे कागद असतील तर ते तुम्ही सादर करू शकता. जर कोणाकडे काहीच कागद नसतील तर समितीला ॲफिटेव्हीट द्यायचं आहे. त्यामध्ये, आमचे पूर्वज १९६७ च्या आधीपासून इथले रहिवासी आ-होत, असा उल्लेख असेल. ज्यामुळे जात प्रमाणपत्र मिळेल. त्यानंतर, जात पडताळणीची जी पद्धत आहे ती पुढची आहे, असे सिद्धार्थ शिंदे यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितले.

शासनाचा हा जीआर,कोणीही उच्च न्यायालयात चॅलेंज करू शकतं. असंवैधानिक आहे, भेदभाव करणारा आहे या ग्राऊंडवर शासन निर्णयाला चॅलेंज केले जाऊ शकते. हा शासन निर्णय खऱ्या अर्थाने कधी प्रमाणित होईल, जेव्हा या निर्णयानुसार पहिले जात प्रमाणपत्र दिले जाईल. पण, हे महत्त्वाचे पाऊल आहे, असेही सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले. न्यायमूर्ती शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत वेळ देण्यात आलेला आहे. त्यामुळे, उद्यापासूनच ह्या प्रक्रियेला सुरुवात होईल. मराठा समाजाला कागदपत्रे जुळवणे, नातेवाईकांचे प्रमाणपत्रांची जुळवाजुळव करावी लागेल. त्यामध्ये, चॅलेंजच येतील, वैयक्तिक हरकती देखील घेतल्या जातील. उद्यापासून कुणालाही प्रमाणपत्र मिळणार नाही, पण उद्यापासून प्रमाणपत्राची प्रक्रिया सुरू होईल, अशी विधिज्ञ माहिती शिंदे यांनी दिली. सरकारने हैदराबाद गॅझेटियर उद्या लागू केल्यानंतर, मराठ्यांना जातप्रमाणपत्र मिळायला लागलं, जातपडताळणी झाली तर मग मराठ्यांना ज्या तीन कॅटेगरी आहेत कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा याचे प्रमाणपत्र मिळाले आणि या प्रमाणपत्रांती पडताळणी झाली तर ते ओबीसीमध्येच येणार. ओबीसीचे सर्व फायदे मराठा बांधवांना मिळणार आहेत. हैदराबाद गॅझेटियर जीअ-ारप्रमाणे जी प्रमाणपत्र दिली जातील, ज्याची व्हॅलिडिटी होईल, त्यांना ओबीसीच्याच सुविधा मिळणार आ-हेत, असे सिद्धार्थ शिंदे यांनी स्पष्ट केले. अर्थातच, त्यामुळे ओबीसी समाज नाराज होईल. पण, या निर्णयानुसार जात प्रमाणपत्र मिळाल्यास लाखो मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसीमध्येच सहभागी होणार आ-हात.

## संपादकीय....

### मागण्यांना यश

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आलं. मनोज जरांगे यांनी केलेल्या आठपैकी सहा मागण्या मान्य झाल्या. त्यामधील हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्याची प्रमुख मागणी मान्य झाली. त्याचा फायदा मराठवाड्यातील बहुतांश मराठ्यांना होणार आहे. मराठा आणि कुणबी आहे असा जीआर काढा, मराठा कुणबी एकच हा जीआर जारी करा. त्यावर, ते म्हणाले किचकट आहे त्याला वेळ लागेल म्हणे, १ महिना लागेल. पण, मी म्हणतो त्याला २ महिने घ्या पण जी आर काढा. आता सगेसोयरेचा निर्णय घ्या म्हणालो. ते म्हणताय याला वेळ लागेल, ८ लाख चुकीच्या नोंदी आहेत, त्याबद्दल वेळ लागणार आहे. आता, हैदराबाद आणि सातारा या २ गॅजेटच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. बाकी ५ मागण्यांचा शासन निर्णय काढू म्हणत आहेत, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शासनाने आपल्या मागण्या मान्य केल्याची घोषणा केली. आझाद मैदानावर एक मराठा, लाख मराठा, छत्रपती शिवाजी महाराज की जय... गणपती बाप्पा मोरया.. अशी घोषणाबाजी करण्यात आली. मुंबईतील आझाद मैदान परिसरात पाटील पाटील.. घोषणांनी दुमदुमला होता. जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील मागण्या राज्य सरकारच्यावतीने मान्य करण्यात आल्या असून मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले, मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर होते. यावेळी, कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या याची माहितीही जरांगे पाटील यांनी दिली. तसेच, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी २ महिन्यांचा अवधीही राज्य सरकारला देण्यात आला आहे.

## मनसेकडून वृद्धाश्रमातील मातांचा यथोचित सन्मान



पंढरपूर/प्रतिनिधी

वृद्धाश्रमातील महिलांकडे लक्ष दिले जात नाही. मनसे नेते गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोपाळपूर मध्ये उद्धार क्षमा मध्ये असलेल्या मातृशक्ती सन्मान केला मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आगळावेगळा कार्यक्रम घेतला म्हणून त्यांची कौतुक होत आहे

स्टेशन रोड येथील चंद्रमौळी मंडळाचे श्री दिलीप धोत्रे आधारस्तंभ आहेत प्रत्येक वर्षी गणेशोत्सवाच्या काळामध्ये ते मोठी सहकार्य करतात यंदाच्या वर्षीही गणेशोत्सव श्री च्या मूर्तीची पूजा त्यांच्या हस्ते करण्यात यावेळी धोत्रे यांनी एवढी गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमातील महिलांना गणेशाची आरती करण्यासाठी बोलवली व त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. नित्य उपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमामुळे वृद्धाश्रमातील महिला भावनिक झाल्याचे दिसून आले.

मातोश्रमातील महिलांना सन्मान केल्याबद्दल मनसेने ते दिलीप धोत्रे यांची कौतुक केले जात आहे. ती नेहमी समाज उपयोगी काम करत आहेत.

# व्यवसायातून उन्नती साधूया.. जीवनाचा उत्कर्ष घडवूया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राज्यातील युवक-युवतींमध्ये असलेल्या प्रचंड क्षमतेला दिशा देण्यासाठी व स्वप्नांना वास्तवात आणण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील मागास घटक, बेरोजगार युवक-युवती यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देऊन विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येत असून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात येत आहेत.

युवकांच्या हाताला रोजगार दिला तर ते इतरांसाठीही रोजगार निर्माण करतील. याच विचाराने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कार्यरत आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी व उद्योग-व्यवसायात तरुणांना संधी देण्यासाठी या महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील एक महत्त्वाचे महामंडळ आहे. हे महामंडळ प्रामुख्याने मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुणांना आर्थिक सहाय्य पुरवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. या महामंडळाची स्थापना २७ नोव्हेंबर १९९८ रोजी मराठा समाजातील बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अल्प व्याजदर कर्ज सुविधा, अनुदानावर आधारित आर्थिक योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन आणि तरुणांसाठी व्यवसाय योजना अशा आर्थिक विकासाच्या योजना राबवल्या जातात. या योजनांचा मुख्य उद्देश मराठा समाजातील तरुणांना व्यवसायासाठी लागणारी भांडवली मदत पुरवून त्यांना स्वावलंबी बनवणे. यामुळे अनेक तरुणांनी स्वतःचे उद्योग सुरू केले आहेत. या महामंडळाच्या मदतीमुळे ग्रामीण भागातसुद्धा उद्योजकतेचा विकास होताना दिसत आहे.

**अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांसाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. नियोजन विभागाने याबाबतचा शासन निर्णय १५ जुलै २०२५ रोजी निर्गमित केला आहे.

या महामंडळा मार्फत वैयक्तिक कर्ज आणि गट कर्ज व्याज परतावा या योजना राबवल्या जातात.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना(IR-I)**

या योजनेअंतर्गत राज्यातील कोणत्याही बँकेमार्फत १५ लाख रुपयाच्या मर्यादेत कोणत्याही व्यवसाय / उद्योगाकरीता लाभार्थ्यांनी कर्ज घेतल्यास, त्या कर्जावरील व्याज परतावा जास्तीत-जास्त ७ वर्षाकरीता, १२ टक्केंच्या कर्ज दर मर्यादेत अथवा ४.५ लाख रुपये रक्कमेच्या मर्यादेत देण्यात येतो. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) १,८९,३१८ तर एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी संख्या १,५३,७२६ असून बँकांनी वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम १३,१६९.९९ कोटी आहे.

व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) १,७५,८३६ असून व्याज परतावा झालेली रक्कम १,३६१.५८ कोटी रुपये आहे.

**गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)**

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन, दोन व्यक्तींसाठी कमाल २५ लाख रुपयाच्या मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी ३५ लाखाच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी ४५ लाखाच्या मर्यादेवर व पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाखापर्यंतच्या व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र (LOI) १०१४ असून एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी गट संख्या ९६९ आहे. एकूण बँकेने वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम ३६१.८७ कोटी आहे.

व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) ५८९ आहे. व्याज परतावा झालेली रक्कम ३४.०३ कोटी आहे.

गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I): FPC (Farmer Producer Company) गटांना १० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज उद्योगासाठी देण्यात येते व ७ वर्षे वसुली करण्यात येते. सद्यस्थितीत गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I) ही गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. महामंडळामार्फत २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना व लाभार्थी गटांना एकूण १,३९८.९६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

**महामंडळाच्या योजनांकरिता अटी व शर्ती**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे. (जे ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक I.T.R. (पती व पत्नीचे) लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल.पी. कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय / उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८९/ रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

**योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यपध्दती**

महामंडळाकडून 'Letter of Intent (LOI) काढण्यासाठी खालील कागदपत्रे लागतात. ही कागदपत्रे ऑनलाइन अर्ज करताना अपलोड करावी लागतात.

पात्रता प्रमाणपत्र (LOI) करीता महत्वाची कागदपत्रे :

१. आधार कार्ड (अपडेटेड मोबाइल क्रमांक व स्वतःचा ई-मेल आयडीसह)

२. रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक बुक)

३. उत्पन्नाचा पुरावा

(उत्पन्नाचा दाखला / आयकर रिटर्न जर लग्न झाले असल्यास, नवरा-बायकोचे व लग्न न झालेल्या सदस्यांचे स्वतःचे आयकर रिटर्न आवश्यक)

४. जातीचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला/General Register उतारा नंबर १ किंवा जातीचा दाखला.

५. लग्न झालेल्या महिलांसाठी Pan Card / Marriage Certificate / गॅझेट आवश्यक.

६. एक पानी प्रकल्प अहवाल (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

७. स्वतः घोषणापत्र (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे)

(जर आधार कार्ड व शाळा सोडल्याचा दाखला यामधील जन्म तारखे मध्ये तफावत असल्यास)

ही कागदपत्रे अपलोड करताना त्यांची स्कॅन केलेली प्रत स्पष्ट आणि वाचण्यायोग्य असावी. अर्ज करताना तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज भरावा लागतो. यानंतर तुम्हाला 'LOI' मिळते, जे बँकेत कर्ज मंजुरीसाठी सादर करावे लागते.

तुम्ही कोणत्या योजनेसाठी अर्ज करत आहात (वैयक्तिक किंवा गट) त्यानुसार काही कागदपत्रे बदलू शकतात. अधिकृत आणि अचूक माहितीसाठी, महामंडळाच्या वेबसाइटला भेट देणे किंवा जवळच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधावा.

**अर्ज प्रक्रिया**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज करावा. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला ऑनलाइन अर्ज करून 'Letter of Intent (LOI)' घेणे आवश्यक आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतर ङजख सम वेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा / उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजूरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक EMI वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट).

त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण EMI हफ्ता भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. लाभार्थ्यांने EMI विहित कालमर्यादेत भरला असेल तरच त्याला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट अपलोड करणे अनिवार्य असेल. लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल. या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्याकरिता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हा निहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्ती / संस्थेच्या आमीषाला बळी पडू नये.

या महामंडळाच्यावतीने तरुणांना व उद्योजकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी केवळ भांडवली मदतच नव्हे तर सर्वांगीण मार्गदर्शन आणि आवश्यक प्रशिक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून दिली जाते. महामंडळाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत राज्यातील हजारो तरुणांनी व्यवसाय, सेवा क्षेत्र, उत्पादन उद्योग, लघु व मध्यम उद्योग, तसेच शेतीपूरक व्यवसाय यांसारख्या विविध क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटवला आहे. या तरुणांनी उभारलेल्या उद्योगधंद्यांमुळे केवळ स्वतःचा रोजगार निर्माण झाला नाही, तर इतर अनेकांना देखील रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

राज्य शासनाच्या धोरणांतर्गत महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या या योजना ही फक्त लाभार्थ्यांच्या हितासाठी नसून महाराष्ट्राच्या भविष्याच्या पायाभरणीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना संधी देऊन त्यांना स्वावलंबनाच्या मार्गावर उभे करण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे. या योजना ही केवळ आर्थिक मदत पुरवणारी नसून, आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि मराठा समाजातील घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक प्रभावी साधन ठरल्या आहेत.

**– शैलजा पाटील ,**
**विभागीय संपर्क अधिकारी.**

## १३० वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीचे आपण काटेकोरपणे पालन केले पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे वृत्तपत्र हे चळवळीचे प्रभावी साधन आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रासंगिक विषयावर १३० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा ३१ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, २६ ऑगस्ट १९४० ला मुंबईच्या दामोदर हॉल मध्ये संपन्न झालेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्र हे चळवळीचे प्रभावी साधन आहे. आपल्या सर्व चळवळीचे सार मूकनायक, बहिष्कृत भारत व जनता या स्वरूपात ते आपल्यासमोर उपलब्ध आहे. ज्यात त्यांनी जनता पत्र व भारत भूषण छापखाना मांजरीच्या पिलाप्रमाणे सांभाळल्याची जाणीव करून दिली होती. तर मग वर्तमानात आपली वर्तमानपत्राच्या अनुषंगाने काय स्थिती आहे? आपली परिवर्तनवादी विचाराची वर्तमानपत्रे का चालत नाहीत? याचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९४० ला वृत्तपत्र चालविण्याची अनुषंगाने दिलेल्या दिशेनेर्देशाचे आपण पालन करीत आहोत काय? अशा प्रकारची विचारधारा आपल्या पत्रकातून प्रस्तुत होते काय? याची मीमांसा केली पाहिजे. आपल्यासमोर व शत्रुसमोर उपलब्ध असलेल्या शक्ती, न्यूनता, संधी व आव्हाने याचे तौलनिक विश्लेषण केले पाहिजे. जेणेकरून आपणास उपयोजना करता येतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता व प्रबुद्ध भारत यातून आपण प्रेरणा घेतली पाहिजे. जनतेचे जनमत तयार करण्यासाठी केवळ बातमीपत्र, न्युज पेपर वाचून चालणार नाही तर दृष्टिकोन पत्र व्ह्यूज पेपर वाचावे लागतील. म्हणून परिवर्तनवादी विचाराचे दैनिक, साप्ताहिक, पाक्षिके, मासिके वाचली पाहिजेत. सर्व प्रसार माध्यमांना वेगाने गतिमान केले पाहिजे. त्यांना वाचक वर्ग निर्माण करून देणे व आर्थिक पाठबळ देणे ही आपली जबाबदारी आहे. तळागाळापर्यंत विचारांचा प्रचार प्रसार केला पाहिजे. ती जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे. आपण सर्वांच्या आशा,



आकांक्षा आणि इच्छा पूर्णत्वास जावे असे वाटत असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीचे आपण काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ऐतिहासिक काळात फोर्ड गाडीमध्ये प्रवास घडवून आणणारे सुरेंद्र सिंह उर्फ लाला जी चव्हाण म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिलिंद कॉलेजच्या पायाभरणी संबंधाने कॉलेजला येण्यासाठी जुना बाजार ते मिलिंद कॉलेजपर्यंत त्यांच्या फोर्ड (इधऋ : १७८ :: बी वाय जी : १७८) या गाडीतून प्रवास घडवून आणला आहे. ती गाडी आजही त्यांच्याकडे सुस्थितीत उपलब्ध आहे. त्या गाडीत बाबासाहेबांनी प्रवास केला असल्याने त्यांनी ती गाडी सांभाळून ठेवली आहे. तसेच ज्या माईक मधून बाबासाहेब आंबेडकरांनी आपले वक्तव्य केले होते, तो माईक सुद्धा त्यांनी व्यवस्थित सांभाळून ठेवलेला आहे. त्या माईकला लाखो रुपयाची मागणी आली असताना त्यांनी तो कुणाला विकत दिलेला नाही. त्या काळातील फोर्ड गाडीला फक्त १५ ऑगस्ट आणि विद्यापीठाच्या नाम विस्तार वर्धापन दिनाला बाहेर काढत असतात.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना दैनिक निळे प्रतीकचे संपादक रतन कुमार साळवे म्हणाले की, पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले असले तरी आज तो कसा चालत आहे? हे आपण सर्वजण पहात आहोत. बातमी कुठलीही असो ज्याच्या फायद्याची त्याला आनंद होतो तर ज्याच्या नुकसानीची त्याला दुःख होत असतो. सत्य मांडत असताना फार त्रास होत असतो.

याप्रसंगी पत्रकार डॉ. शेखर मगर म्हणाले की, उच्चवर्णीयांची वर्तमानपत्रे आपली दखल घेणार नाहीत म्हणून ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक सुरू केले होते. ज्यात त्यांनी तुकारामाचे अभंग उद्धृत केले होते. उपेक्षित, शोषित, वंचिताचे प्रश्न मेनस्ट्रीम मीडियामध्ये मांडण्याचे काम करीत आहे. कमलबाई खरात म्हणाल्या की, बहुतांश मीडिया विकल्या गेलेला आहे. ज्यामध्ये कुत्रा हरवल्याची बातमी येते परंतु माणूस मेल्यावर सुद्धा त्याची बातमी येत नसते. अशोक मेश्राम म्हणाले की, २७ जानेवारीला लाखनी येथे संपन्न झालेल्या भीम बुद्ध मेळाव्यात आंबेडकरवादी विचारधारेची वृत्तपत्रे चालावित म्हणून प्रचार प्रसार केला होता. आर. जे. मुगदल म्हणाले की, लोकशाहीत प्रबळ विरोधी पक्षाच्या नेत्याची भूमिका महत्त्वपूर्ण असते. त्यांचे अस्तित्व कमकुवत होत चालले आहे. उद्योजक सशिकांत काळे म्हणाले की, आपण कोणीच लायक नव्हतो, त्यांना लायक बनविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. करिता आपण एकत्रितपणे संघटित राहिले पाहिजे. कुंदन लाटे म्हणाले की, रुग्णांच्या हक्क अधिकाराच्या अनुषंगाने बोलताना शहरात २२ धर्मादाय रुग्णालय आहेत. ज्यांनी दोन टक्के उत्पन्न हे असहाय्य रुग्णांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्याची अंमलबजावणी करावी. एकट्या कमलनयन बजाज हॉस्पिटल कडे असा ७८ कोटीचा फंड उपलब्ध आहे. विलास कटारे म्हणाले की, मुक्या समाजाला बोलके करण्याचे काम मूकनायकने केले आहे. भीमराज बोर्डे म्हणाले की, उद्याचा येणारा काळ फार भयंकर असणार आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. उद्घाटक सुरेंद्रसिंह उर्फ लाला जी चौहाण यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. भीमराज बोर्डे यांनी 'बौधी वृक्ष झाला भीम' तर सुभाष वानखेडे यांनी 'समाजाचा काय रे गड्या, समाजाचे काय?' हे गीत प्रस्तुत केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन अॅड. विलास रामटेके, प्रास्ताविक महादेव डांबरे यांनी तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, अॅड. विलास रामटेके, इंजिनीयर किशोर पाटील, वामन कांबळे, एकनाथ पाखरे, रमेश भाई वानखेडे, प्रकाश उजगरे, विलास कटारे, उद्योजक शशिकांत काळे, रवींद्र वाकोडे, उद्योजक मिलिंद बागुल, अशोक कांबळे, पत्रकार डॉ. शेखर मगर, महादेव डांबरे, कुंदन लाटे, आर. जे. मुगदल, शुभम सौदागर, सुभाष वानखेडे, भीमराज बोर्डे, अरुण इंगळे, अशोक मेश्राम, कमलबाई खरात, कुसुमबाई डांबरे साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महिलांनी जिजाऊ माँ साहेब- सावित्रीबाईचा आदर्श घ्यावा

## सौ.रंगोली अभिलाष सोनुने; मलकापूर पांग्रा येथे आगळे वेगळे गौरीपूजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथील सोनुने परिवारातील सून सौ.रंगोली अभिलाष सोनुने यांनी या वर्षी गौरी पूजनाचा आगळा वेगळा सण साजरा करण्याचा विचार सासू सासरें यांचे सह सोनुने परिवारात मांडला.परिवाराने तात्काळ मान्यता देत आजचा समाज प्रबोधन करणारा आधुनिक गौराई चा सण साजरा करताना कोण काय म्हणेल याकडे लक्ष न देता आपण समाजाला गौरी पूजनाच्या ऐवजी सावित्रीबाई फुले , जिजाऊ माँ साहेब थोर कर्तृत्ववान अशा या महिलेचा आदर्श समोर ठेवून आपण सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँ साहेब यांचे विचारांचं पूजन करायला हवे ,असे मत सौं रंगोली सोनुने यांनी व्यक्त केले.

आपल्या राहत्या घरी मलकापूर पांग्रा येथे सावित्रीबाई फुले व जिजाऊ माँ साहेब,छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमा,भारतीय संविधान,फुले - शाहू - आंबेडकर ,संत गाडगेबाबा यांची विचारधारा सांगणारी ग्रंथ. कॉम्रेड.गोविंदराव पानसरे यांनी शिवाजी कोण होता ? आदी समाज प्रबोधन करणारी ग्रंथप्रदर्शन मांडण्यात आले आहे.

हे थोरांचे विचार प्रत्येकाच्या मनामनात रुजले पाहिजे तसेच ते घराघरात पोहचावेत जेणे करुन आपले मलकापूर पांग्रा हे गाव अंधश्रद्धा मुक्त, नशा मुक्त, स्वच्छ, सुंदर, समृध्द व्हावे अशी संकल्पना सासरे शिवश्री इंजि.विष्णु आश्रुजी सोनुने वयाच्या १८ ते २० वर्षापासून मनात होती.

समाजाला ते आपल्या बोली भाषेमधून संदेश देण्याचा प्रयत्न ही करत असत. परंतु सोनुने साहेब रिलायन्स कंपनीमध्ये एक जबाबदार पदावर नोकरीवर असताना त्यांना वेळ तेवढा मिळत नसल्याने हे सारे विषय त्यांच्या मनात घर करून बसलेले असताना त्यांच्या सुनबाई सौ.रंगोली अभिलाष सोनुने यांनी आपल्या सासऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या इच्छेनुसार मलकापूर पांग्रा व परिसरातील जनतेला संदेश देणारा हा नाविण्यपूर्ण सण साजरा करण्याची भावना मनाशी बाळगून ताईने हे पाऊल उचललेले दिसून येत आहे. या पासून एक-दोन महिला जरी सुधारल्या त्यांनी फुले - शाहु - आंबेडकर,संत गाडगेबाबा या थोरांची विचारधारा अंगिकारली तर मोठे परिवर्तन दिसून येईल अशी इच्छा सौं रंगोली सोनुने व सोनुने परिवारांची दिसून आली.

सासरे विष्णू सोनुने यांनी आपली इच्छा व्यक्त केली की मला ६० वर्ष पूर्ण झालीत.उरलेल माझं आयुष्य समाजाच्या व गावच्या भल्यासाठी असेल.समाजाला - गावाला जास्तीत जास्त वेळ देण्याचा मी प्रयत्न करीत राहील.

गावाचा विकास कसा होईल यासाठी मी सदैव प्रयत्नशील असेल,असा मनोदय शिवश्री इंजि.विष्णु सोनूने यांनी प्रसंगी व्यक्त केला.

# सिरत-उन-नबी प्रश्नोत्तरे स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद; ४२९ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : ईद ए मिलादनिमित्त आझाद ग्रुपच्यावतीने आयोजित सिरत-उन-नबी प्रश्नोत्तरे परीक्षा रविवारी यशस्वीरित्या पार पडली. या परीक्षेत ४२९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यामध्ये मुलींची संख्या उल्लेखनीय होती. आझाद ग्रुपने डीजेला फाटा देऊन मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन चारित्र्याची माहिती मुलांना व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्याला चांगल्या पद्धतीने प्रतिसाद मिळाला आहे. इस्लामपुरा येथील गॅलेक्सी फंक्शन हॉल येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धा दोन गटात घेण्यात आली



ग्रुप १ मध्ये ४ थी ते ७ वी तर ग्रुप २ मध्ये ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची उंची वाढावी आणि धार्मिक तसेच सामाजिक जाणीवा बळकट व्हाव्यात, हा या उपक्रमामागचा उद्देश होता. स्पर्धेचा निकाल आणि पारितोषिक वितरण सोहळा ५ सप्टेंबर रोजी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रुप १ मध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्याला कुलर, द्वितीय आणि तृतीय क्रमांकास कॉम्प्युटर स्टडी टेबल देण्यात येईल. तर ग्रुप २ मधील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला सायकल, आणि द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर स्टडी टेबल बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिला जाणार आहे. मान्यवरांचं मार्गदर्शन ऐकण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी पारितोषिक वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक उमरान मिर्झा यांनी केले.

# महात्मा फुले विद्यालय, सिंदखेड राजाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**१४ वर्ष वयोगटातील कुस्ती स्पर्धेत ऋषी एखंडे जिल्हास्तरीय निवड झाल्याबद्दल डॉ कळकुंबे पाटील यांनी अभिनंदन केले.**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील शेलू येथील ऋषीं गणेश एखंडे याने क्रीडा संकुलन येथे आयोजित जिल्हास्तरीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली. मात्र कुस्तीच्या अखाड्ययात महात्मा फुले विद्यालय चा विद्यार्थी ऋषीं एखंडे याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

१४ वर्ष वयोगटातील कुस्तीमध्ये ऋषीं याने आपल्या चुरशीच्या खेळीवर भक्कम पकड ठेवत प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली आणि बुलढाणा जिल्याह्यात क्रमांक पटकाविले.

अतिशय हलाखीच्या व गरीब परिस्थितीत देखील ऋषीं आपल्या खेळाशी निष्ठा राखत कुस्तीची परंपरा जोपासली आहे. त्याच्या मेहनतीला आणि चिकाटीला आज यशाचे गोड फळ लाभले आहे. या यशामुळे रुम्हणा विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून शेलू गावकऱ्यांमध्ये, शिक्षकवर्गात व तालुक्यातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. ऋषीं च्या या विजयाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत असून पुढील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत देखील तो नावलौकिक मिळवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# बुधवासी राधाबाई भिमराव माने यांच्या स्मरणार्थ ८० जणांचे रक्तदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : शेळगी येथील जय मातृभूमी मित्र मंडळाच्या वतीने रविवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास बुद्धवासी राधाबाई

**जय मातृभूमी मित्र मंडळाचे उपक्रम**

भीमराव माने यांच्या स्मरणार्थ वर्ष चौथे ८० जणांनी रक्तदान केले.

मंडळाचे अध्यक्ष अभिजीत पोतदार, उपाध्यक्ष निखिल बेनूकर, खजिनदार अनिल चौखंडे, यावेळी विष्णु वर्धन, गोविंद तांदळे, प्रमोद लवटे, सिद्धेश्वर रासुरे, सागर पांधारकर, रोहित हिप्परगे, समर्थ माने, विशाल अलोळी, राकेश हिरेमठ, कैलास तापडिया, जगदीश वडापूरकर, शंकर उपिन, महेश पसारे, योगेश जोडमोटे, कृष्णा सरवदे, आशिष राठोड, अजित राठोड, अर्जुन सरवदे, इतर मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहीर करा : भीमशक्ती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : मे महिण्यात आणि त्या नंतरचे जुलै आणि ऑगस्ट महिन्यात सोलापूर सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये. पावसाने. जो. धुमाकूळ. घातला त्या मध्ये सोलापूरसाह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी. संकटात सापडला असून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे जास्त पाऊसामुळे खरीप पेरणी. करता. आलो. नाही परंतु ज्या शेतकऱ्यांनी. थोडी. फार. पेरणी. केली त्याची. पीक. वाहून. गेली. शेतातील. माती. नामती वाहून. गेली. काही ठिकाणी शेतात कंबरे एवढे. पाणी. उभा. राहिले. आहे. यासेच शासनाच्या. नियमानुसार. पावसाची जी. मर्यादा आहे त्यापेक्ष्या. कितीतरी पटीने पाऊस. जास्त पडला. आहे त्यामुळे. शेतकऱ्यांचे कधी. न. भरून. येणारे. नुकसान झाले. आहे. त्या. मुळे महाराष्ट्र सरकारने सोलापूर. सह. महाराष्ट्रा. मध्ये. ओला. दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी. मा. खाजदार. हंडोरे. साहेब यांच्या. आदेशानुसार जिल्हा अधिकारी. यांना मागणीचे निवेदन. देण्यात आले या. वेळी भीम शक्ती संघटनेचे. सुबोध. वाघमोडे. राजाभाऊ कदम उमेश सुरते सलीम मुल्ला. मेजर साबळे मनोज लोंढे प्रमिला. तुपलोंढे. ज्योती. गायकवाड. इब्राहिम शेख. समीर मुजावर मुमताज तांबोळी. मयूर तळभंडारे माया कांबळे. के एम कांबळे अशोक. नगटिळक कीर्ती. शिवशरण सचिन. सुरवसे मिलिंद कांबळे प्रकाश सिताफळे इत्यादी प्रमुख पदाधीकारी उपस्थित होते.

**तालुकास्तरीय स्पर्धा : शिक्षण विभागाचे विविध कला उत्सव**

# नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळेचा लोकनृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : शहराला लागून असलेल्या नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेचा आदिवासी पारंपरिक लोकनृत्य स्पर्धेत केवळ एक गुणांच्या फरकाने द्वितीय क्रमांक पटकावण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला गोंदियाचे गटशिक्षणाधिकारी श्री. डोंगरे, गट समन्वयक श्री. परतेकी, परिक्षक ढावळे, गोटेफोडे तसेच तालुक्यातील सहभागी शाळांचे शिक्षक आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

पंचायत समिती गोंदिया गटशिक्षणाधिकारी कार्यालय गटसाधन केंद्र कटंगी (कला) येथे (दि. १ सप्टेंबर) सकाळी ११.०० वा आयोजित करण्यात आले होते. लोकसंख्या




शिक्षण उपक्रम या शासनाच्या अंतर्गत कला महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये तब्बल १२ प्रकारातील कलात्मक कौशल्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी दरवर्षी आयोजन होते.

सदर उपक्रमात फक्त एक गुणांच्या फरकाने अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री या शाळेला हेतुपुरस्सर द्वितीय क्रमांक देण्यात आले. लोकनृत्य सादरीकरणाची संकल्पना, थीम, चित्रांकित संदेश अशी वैविध्यपूर्ण निर्मिती मुन्नाभाई नंदागवळी यांची होती. यामध्ये सहभागी नैतीक सचिन कुडवे, तन्मय अमरदीप वासनिक, तुषार देवानंद साऊस्कार, कुणाल हिमंत बडोले, नृत्य व मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी, आशिष शहारे यांनी सहभाग घेतला होता.

प्रसंगी मुख्याध्यापक रविशंकर इठुले, नीता भलमे, साधना पारधी पुष्करराज लांजेवार, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, तुषार महाजन यांनी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करुन कौतुक केले.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'ॲडव्हान्स्ड इंडस्ट्रियल ऑटोमेशन कंट्रोल' ही कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागामार्फत 'ॲडव्हान्स्ड इंडस्ट्रियल ऑटोमेशन कंट्रोल' या विषयावर दि.२२ जुलै २०२५ ते दि.०२ ऑगस्ट २०२५ अशा तब्बल दोन आठवड्यांची कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी इंडस्ट्रियल ऑटोमेशन इंडस्ट्रीची रचना, फील्ड डिव्हाइसेसची माहिती, कंट्रोलर्सची आओळख तसेच पीएलसी विरुद्ध मायक्रोकंट्रोलर यांची सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मंगरूळ (कर्नाटक) मधील इंडवेल ऑटोमेशन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हिमांशू कुमार हे लाभले होते. या कार्यशाळेत पीएलसी ब्लॉक डायग्राम, लॅडर डायग्राम प्रोग्रॅमिंग, कोडेसिस सॉफ्टवेअरचा वापर, लॅच-इंटरलॉक-फ्लॅग प्रोग्रॅम्स, टायमर व काउंटर बेस्ड प्रोग्रॅम्स, पीएलसी आणि जीएक्स सॉफ्टवेअर यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. याशिवाय पीएलसी वायरिंग, प्रोजेक्ट डेव्हलपमेंट, एचएमआय व स्काडा स्क्रीन मित्सुबिशी




डेव्हलपमेंट, व्हीएफडी, एसी ड्राईव्हचे पॅरामीटर्स, एसीडी-डीएसी चे अनुप्रयोग तसेच रिअल-टाईम अप्लिकेशन्स यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सराव, सिम्युलेशन व प्रोजेक्ट डेव्हलपमेंट करून तांत्रिक कौशल्य आत्मसात केले. कार्यशाळेचा समारोप क्विझ टेस्ट व प्रमाणपत्र वितरणासह उत्साहात पार पडला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल ऑटोमेशन क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळाले तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमुळे औद्योगिक कौशल्य विकसित झाले. विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना सदरच्या कार्यशाळेचा फायदा होणार आहे. ही कार्यशाळा स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली. या कार्यशाळेत अंतिम वर्षातील १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. शशिकांत कांबळे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन डॉ. एन.पी. कुलकर्णी यांनी केले तर कार्यशाळेचे आभार विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद यांनी मानले.

# गावाला ग्रामसेवक असून अडचण नसून खोळंबा

## दोन महिन्यांपासून ग्रामसेवक गायब; सांगा ग्रामसेवक साहेब तुम्हाला शोधायचं कुठं?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
औसा प्रतिनिधी /अमर जाधव

औसा, तालुक्यातील सारणी गावचे ग्रामसेवक हे संपपूर्ण गावचा कारभार हाकतात मात्र तब्बल दोन महिन्यापासून सारणी गावाचे ग्रामसेवक गावात फिरकलेच नाहीत परिणामी गावातील नागरिकांचे विविध कागदपत्रा वाचून अतोनात हाल होत आहेत.




सारणी गाव हे तालुक्याच्या शेवटचे टोक असून येथे ग्रामसेवक महिना महिना साद फिरकतही नाही. गरीब व सर्वसामान्य माणसाचे कामे ठप्प झाली असून कसल्याही प्रकारचा कागद मिळण्यासाठी ग्राम सेवकाला वारंवार फोन करून विनंती करावी लागते तर सध्याची स्थिती गावाला ग्रामसेवक कोण आहे हे गावाला माहितच नाही. सामान्य माणसांचे कामांचे काय असा प्रश्न जनतेत पडला आहे. सारणी गावाला ग्रामसेवक यांचे वेळापत्रक निश्चित करूनही ग्रामसेवक त्या दिवशी गावात उपस्थित राहत नाहीत.

सारणी गावची ग्रामपंचायत तीन ते चार महिन्यापासून उघडलीच नसल्याने ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत धुळखात पडली आहे

या विषयावर ग्रामस्थांनी सरपंच व उपसरपंच यांना वारंवार कळवून ही दखल घेण्यास तयार नाहीत. तरी शासनाने या विषयाची चौकशी करावी. ग्रामस्थांना न्याय मिळेल का? सारणी गावाला ग्रामसेवक मिळेल का? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# भिवंडीत रस्ते अपघातात दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू : भिवंडीतील रस्ते बनले मृत्यूचे सापळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील विविध रस्ते मृत्यूचे सापळे बनले असून, अनेक जणांना खड्ड्यांमुळे आपला जीव गमवा लागला आहे. त्यातील एक घटना घडली आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन रस्त्यावर खड्ड्यात दुचाकी आदल्याने दुचाकी स्वराचा धामणगाव येथे आयवा डंपरच्या खाली येऊन दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.लाप येथील रहिवासी असून कामावरून घरी जात असताना हा अपघात झाला आहे. विलास बबन पाटील (वय ५०) यांचा दुर्दैवी मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून भिवंडी तानसा पाईपलाईन रस्ता नादुरुस्त असून या रस्त्यावरून एक गाड्यांची वर्दळ सुरू असते. तर याच तानसा पाईपलाईन रस्त्याने २५ ते ३० गावातील नागरिकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे.विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजला जाताना, तर रुग्णांना दवाखान्यात नेण्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. भिवंडी तालुक्यातील

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्यूची ही चौथी घटना आहे. त्यामुळे नागरिकाचा संताप व्यक्त होत आहे. भिवंडी शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यांची दुरावस्था झाल्याने पुन्हा एकदा या खड्डेमुळे रस्त्यामध्ये आदळून दुचाकी स्वराचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून



सदर घटनेचा तपास तालुका पोलीस अधिकारी करत आहेत.

# श्री अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या चेअरमनपदी नागेश फाटे तर व्हाईस चेअरमनपदी अण्णा यशवंत नागटिळक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीच्या चेअरमन पदी नागेश एकनाथ पाटील यांचे तर व्हाईट चेअरमन पदी अण्णा ईश्वर त्यांच्या जीवनाची एक मताने निवड करण्यात आली.




मंगळवार दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी दुसरी विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संस्थेच्या वार्षिक निवडणूक सन २०२४ /२५ ते २०२९ /३० बिनविरोध पार पडली. यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बी एस घोडके (सहाय्यक सहकारी संस्था अधिकारी पंढरपूर) यांनी काम पाहिले यानंतर नूतन संचालकाची पहिली सभा केळीमुळीच्या वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी चेअरमन ,व्हाईस चेअरमन, यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी नूतन चेअरमन नागेश एकनाथ पाटील यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेऊन पुढील वाटचालीसाठी बांधिलकी व्यक्त केली. तसेच संस्थेचे सर्व सदस्य, मान्यवर उपस्थित आमचे आभार मानले.

यावेळी नूतन संचालक हनुमंत नरहरी काळे, उमेश एकनाथ फाटे, अर्जुन न्यानेश्वर सावंत, अभिमन्यू विजयकुमार पवार, श्रीमती प्रभावती पोपट फाटे, सौ विदुलता बाळासो बागल, औदुंबर सुधीर कांबळे, डॉक्टर रमेश एकनाथ फाटे, औदुंबर भगवान माने, या सर्व नूतन संचालकाचा मान्यवरांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सुधाकर कवडे माजी संचालक ( सहकार शिरोमणी कारखाना) अँड पांडुरंग चवरे, योगेश ताड ( संचालक सहकारी शिरोमणी साखर कारखाना) सत्यवान बागल, नागेश काका परदेशी, श्री विठ्ठल अर्बन मल्टीस्ट निधी संचालक गोरख नाना बागल, संजय पवार, संजय बागल, शांतिनाथ बागल, हनुमंत फाटे सर, प्रभाकर बागल डॉक्टर माणिक मस्के समाधान पाटील गुलाब भाई मुलानी मॅनेजर संग्राम कापसे प्रदीप बागल अनिल बागल पोपटबागल ,गणेश बागल, शुभम फाटे, ओंकार फाटे, वैजनाथ चवरे, संतोष पुणेकर, ओंकार कटले, समाधान बागल ऋषिकेश बागल समाधान कांबळे आदमीने मॅडम सुमित बागल, श्रीधर पिसे आदी मान्यवर उपस्थित होते.

# एस.सी, एस.टी,ओबीसींची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी त्वरीत करुन वेळेत प्रमाणपत्र देण्याची रिपाईंची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील एस.सी, एस.टी,ओबीसी प्रवर्गातील जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळण्यास दिरंगाई होत आहे, कॉलेजच्या विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणात सादर न केल्यास शैक्षणीक क्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांचे प्रचंड मोठा प्रमाणात नूकसान होत असून त्यांना येत्या दि. ०८ सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत सर्व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळवून देण्यात यावे याबाबतचे निवेदन रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाई अक्कलकोट शाखेकडून सोलापूर जिल्हा जात पडताळणी समितीचे सचिव संतोष जाधव यांना अक्कलकोट शहर सरचिटणीस शुभम मडीखांबे, युवक तालुका सरचिटणीस तम्मा दसाडे यांनी दिले.



अक्कलकोट तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांचे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत. विद्यार्थी अनेकवेळा हेलपाटे मारुन देखील त्यांना प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थी व पालक वर्गांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विद्यार्थ्यांना कॉलेजकडून वेळेवर प्रमाणपत्र सादर न केल्यास आपणावर होणाऱ्या पुढील नुकसानीस जबाबदार रहाल अशी नोटीस बजावली असून तरी जिल्हा जात पडताळणी समितीने त्वरीत याबाबत गांभीर्याने लक्ष घालून विद्यार्थ्यांना त्वरीत जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र देऊन सहकार्य करावे अन्यथा रिपाइंच्या वतीने जात पडताळणी समिति कार्यालयासमोर हलगीनाद आंदोलन ' करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला आहे.



# अवैध गांजा बाळगणारा इसम जेरबंद; निफाड पोलीसांची कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

नाशिक ग्रामीन जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, यांनी नाशिक ग्रामिण जिल्हा अमंली पदार्थ मुक्त करण्याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. तसेच त्याबाबत मार्गदर्शन करुन कठोर कारवाई करण्याची आदेशीत आहे.त्या अनुषगाने दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी पो.शि.योगेश हिरामण आव्हाड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की गणेश राऊत रा.पेठगल्ली निफाड ता. निफाड याने त्याचे गणेश किराणा दुकानात लाकडी दरवाज्याच्या पाठीमागे असलेल्या काळ्या रंगाचे बॅगमध्ये ०८ किलो वजनाचा गांजा आहे बाबत खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलिस निरिक्षक सोनल फडोळ, पोलिस हवालदार. किरण ढेकळे, पो.हवा. कपालेश्वर ढिकले, पो.हवा. अनिल शेरेकर, मपोना सारिका जाधव, पो. शि. राजेंद्र दरोडे, पो.शि. विक्रम लहाणे, पो.शि.विनोद जाधव, पो. शि.धनंजय बैरागी असे पेठगल्ली गणेश किराणा दुकान येथे असलेल्या इसमास पोलीसांची व पंचांची ओखळ करुन देवुन त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप उर्फ गणेश आशोक राऊत वय ४५ वर्ष रा. पेठगल्ली निफाड ता.निफाड जि. नाशिक असे सांगितले असता त्याचे गणेश किराणा दुकानातील लाकडी दरवाज्याच्या पाठीमागे असलेल्या काळी रंगाची बँक चेक केली असता त्यात खालील प्रमाणे गांजा मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

१) पॅकेट नंबर ०१ चे वजन ०२ किलो ०५ ग्रॅम पॅकेट २) पॅकेट नंबर ०२ चे वजन ०१ किलो ९९४ ग्रॅम ३) पॅकेट नंबर ०३ चे वजन ०१ किलो ९९७ ग्रॅम ४) पॅकेट नंबर ०४ वजन ०२ किलो १६ ग्रॅम १,६०,२४०/-रुपये किं. (प्रत्येकी २००००/- किलो ग्रॅम) वरील प्रमाणे मुद्देमाल जप्त करुन पो.शि. विक्रम बाबुराव लहाणे यांचे फिर्यादीवरुन गुरनं २९९/२०२५ एन.डी.पी.एस.८ (क), २० (ब) (खख) प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये आरोपीकडुन गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सोनल फडोळ हे करीत आहे. सदर कारवाई नाशिक ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधिक्षक . आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे

विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला - पुष्प - ६

# स्वराज्यप्राप्ती जे लढले त्यांच्या श्वासात-ध्यासात राजं होतं प्राणाची पर्वा न करता मावळे लढले स्वराज्य प्राप्ती झाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट /प्रतिनिधी :

छत्रपती शिवराय हे त्यागाचे व्यासांगमुर्ती होते . स्वराज्य प्राप्तीसाठी त्यांची दुर दृष्ठी मोठी होती . स्वराज्या करिता प्राणाची पर्वा नकरता मावळे लढले त्यांच्या श्वासात ध्यासात राज होत म्हणून स्वराज्याची निर्माती झाली . असे प्रतिपादन दिग्पाल लांजेकर यांनी केले .

विवेकानंद प्रतिष्ठान अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सवा निमित्य आयोजित व्याख्यानमालेत ६ वे पुष्प गुंफताना श्वासात राज ध्यासात राज हा छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास दिग्पाल लांजेकर, दिग्दर्शक शुभम गायकवाड संगीत नियोजन गौरव भावडे निर्मिती सहाय्यक प्रितम साळवे अवधुत गांधी यांनी अंत्यत परिणामकारक सादर केला .



दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन दिगपाल लांजेकर आदित्य जोशी ओंकार पाठक मयुर स्वामी राघवेंद्र बागेवाडीकर मुरली बेळगावकर रोहन राठोड यांच्या हस्ते करण्यात आले . निर्मिती प्रमुख कुशल खोत कलाकार . दिग्पाल लांजेकर संगीत नियोजन गौरव धावडे निर्मीती सहाय्यक शुभम गायकवाड प्रितम साळवे गायक अवधुत गांधी आदि कलाकारांचा विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने रोपटे समर्थाची प्रतिमा कृपावस्त्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला .

याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी प्रा भिमराव साठे, मुकुंद पतकी, राचप्पा वागदरे, ओमप्रकाश तळेकर प्रदिप पाटील, अशोक येणगुरे मलकप्पा भरमशेट्टी चंद्रकांत दसले, महेश कापसे, प्रफुल इचगे मल्लीनाथ मसुती गुरुपादप्पा आळगी प्रदीप तोरस्कर विजय तडकलकर खंडेराव घाटगे आदि बहुसंख्य रसिक श्रोते महिला वर्ग उपस्थित होते .

**छत्रपती शिवराया चा जाज्वल इतिहास जन्म बालपण अनेक लढाया अफजल खान वध पुरंदर वेढा पावत खिंड शाहिस्तेखान आग्रा हुन सुटका स्वराज्याभिषेक असे अनेक प्रसंग उत्तम धारधार संवाद फेक सुस्वर आवाजात प्रसंग उभे केले.**

# निफाड शहरात पोलिसांचा रूट मार्च

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी :

निफाड शहरासह परिसरात गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद चा सण शांततेत व उत्साहात पार पाडावेत तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी निफाड पोलीस ठाणे तर्फे शहरातील छत्रपती शिवराजी महाराज चौक, मुसलमान गल्ली, संग्राम गल्ली, भवर गल्ली, जामा मज्जिद, मामलेदार चौक, माणकेश्वर चौक, शिंपी गल्ली, पेठ गल्ली, शनी चौक ते नवीन सरकारी दावाखाना मार्गे उगाव रोड, शांतीनगर त्रिफुली, वैनतेय शाळा अशा विविध भागातून रूट मार्च काढण्यात आला.

याप्रसंगी निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी के,के पाटील तसेच निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, निफाड, सायखेडा, पोलीस ठाण्याचे सपोनि, यांचे प्रमुख उपस्थितीत निफाड पोलीस ठाण्याचे २४ अंमलदार, आर सी पी नाशिकचे २९ जवान, एस आर पी चे १९ जवान, सायखेडा पोलीस ठाण्याचे तीन अंमलदार ,निफाड होमगार्ड पथक ३८ आदींचे उपस्थितीत रूट मार्च काढण्यात आला होता

